PlanetRead
Literacy for a Billion

Movie: Amar bhoopali
Year: 1951

Song: Fadfad fadkato
Lyricist: Shahir Honaji Bala

फडफड फडफड फडकतो
भगवा झेंडा गगनात
फडफड फडफड फडकतो
भगवा झेंडा गगनात
फडफड फडफड फडकतो
भगवा झेंडा गगनात
सर्वांग भरलं त्याचं
न्हाला उभा रक्तात
हरहर महादेव हरहर महादेव
हर महादेव हर महादेव
हरहर महादेव त्याचा शब्द
जाई कण्ह्यात
फडफड नाही
फडफड नाही त्याची तडफड
घ्या रं ध्यानात
येड्या बोकडावानी का रं
भटकताया रानात
जर का नाही जागं झालात
झेंड्याला साथ
दिली नाही खाट
ठेवल्या लाजा रामा
हे रामा रं जी रं दाजी जी जी
हे रामा रं जी रं दाजी जी जी
परंपरा त्याची वैभवशाली
परमुखी लाली जगावर आली
कोण लपवील
अभिमानास्पद इतिहास
जगी जन्मास घालायला खास
शिवप्रभू आलं
आलं हो आलं शिवप्रभू आलं

आलं हो आलं शिवप्रभू आलं
रक्त मंथनात भगवा झेंडा रूपी
बाळ रत्न जन्माला आलं
आलं हो आलं शिवप्रभू आलं
आलं हो आलं शिवप्रभू आलं
जनतेनं प्राण यज्ञानं
त्याला पोसलं
कृष्णावानी जन्म घेऊनी
दीन दुबळ्यास्नी अभयदान दिलं
वचनाची करूनी खैरात
नाही फसविलं
पुढं होऊन पूर्ण स्वातंत्र्य मिळवूनी दिलं
पुढं होऊन पूर्ण स्वातंत्र्य मिळवूनी दिलं
आम्हा मराठ्यांचा महाराष्ट्र
जगा शिकविलं
अजब अमृत जगी शिंपीलं
राष्ट्र मेलेलं जिवंत त्यानं केलं
हे मर्दा रं जी रं दाजी जी जी
हे मर्दा रं जी रं दाजी जी जी
बंगालच्या समुद्राला
हादरा त्याचा बैसला
दर्शनासाठी तिष्ठत बसली होती
सिंधूमाई अटकेला
कटकेहून दौडला घोडा
लटकेला गेला
अशी परंपरा ज्याची थोर
वक्तपरी घोर आहे येणार
ऐका तुम्ही राजे हो
हो राजे हो जी रं दाजी जी जी
हो राजे हो जी रं दाजी जी जी

Literacy for a Billion

अटकेला झेंडा लागला
होता पाठिला आनंद होता झाला
आम्हा मराठ्यांसी दोन बोटं
स्वर्ग राहिला
अटकेहून आले नू गेले
थेट रंगमहाला ला
ख्याली खुशालीत महाराष्ट्र
दंग सारा झाला
रंगमहालात नवी बया भेटली त्याला
लावणीचा पाहून शिंणगार
रूप तिचं न्यारं
झाला बहाद्दर पुरा थंडगार
सांगू काय राजे
हो राजे हो जी रं दाजी जी जी
हो राजे हो जी रं दाजी जी जी
लावणीनं वाट दिली
राजे फंद फितूरीला
इश्काच्या प्याल्यामधी
महाराष्ट्र बुडविला
गुंग झाली स्वारी रंगमहाली
घुबडानी संधी साधली
फितूरीची जाळी पसरली
करणीला फळं त्यांच्या आली
मर्कट सेना भवताली
भगवा झेंडा ओढायला खाली
सर तोफ खान्यासह झाली
ही झोप तुम्हाला
काळ झोप ठरणारी
ही इश्कबाजी रवरवी
तुम्हां नेणारी
इश्काची गाणी गाणार काल पोतरं
लावणी रचणारं
विनवितो तुम्हा जाहीर
तोच शाहीर
या रं या सारं मैदानात राजे
हो राजे हो जी रं दाजी जी जी
हो राजे हो जी रं दाजी जी जी
कडेकोट रंगमहालाच्या
भवती उभा करा
नाही जिवंत आली
तर लढता लढता मरा
वीर मराठ्यांचं जर आसलं
दावा पुढं सरा
नाही तर बांगड्या भरा नू
खुशाल जा घरा
इथं सक्ती नाही कोणाला
मर्द एकला मराठा रायेला
शत्रूशी करील मुकाबला
येऊ द्या भला भला नू
लावीन वाटेला
होय होय राजे राजे
हो राजे हो जी रं दाजी जी जी
अहो राजे हो जी रं दाजी जी जी

एक एक मराठा गड किल्ला भासेल
एक एक मराठा गड किल्ला भासेल
फंद फितूरीच्या मुळालाच सुरूंग ठासेल
सह्याद्री पुनःरूपी खदखदून हासेल
दरी कपार जागतील नेत्री घालूनी तेल
अनू गनिमीकाव्याचा हिसका मग उमगेल
यावेळी मराठा कोण मागं राहिल
इश्काचा प्याला तो फोडून फेकून देईल
राखील झेंड्याला देऊन प्राणाचे मोल
नवजोमी स्वातंत्र्याची वेल बहरेल
नवजोमी स्वातंत्र्याची वेल बहरेल
आम्ही घालू नरडीला हात

Literacy for a Billion

ठरली ही बात शत्रूचे दात घशात घालणार

आम्ही आम्ही विजयी होणार

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*